# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ.

(स्वायत्त) (ISO: ९००१:२००८) (ISO/IES : २७००१-२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: २६४७१२५५ (का.)/२६४७ ०९१६ (वै.) फॅक्स ९१-०२२-२६४७३९८०

Email : secretary@msbte.com Web : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-५०/Exemption/२०१७/9223 दिनांक - 11 SEP 2017

**Web Circular**

**विषय : इयत्ता १२ वी सायन्स उत्तीर्ण होऊन प्रथम वर्ष अभियांत्रिकी 'I' Scheme पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी Exemption Subjects**

मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व AICTE Approved संस्थांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मधील प्रथम वर्षापासून 'I' Scheme लागू झालेली आहे. त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ किंवा इतर समकक्ष परीक्षा मंडळातून इयत्ता १२वी सायन्स उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे विषयात सूट (Exemption) देय राहील. सदर विद्यार्थी इयत्ता १२वी सायन्सचे संबंधित विषयामध्ये कमीत कमी ४०% गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच Physics आणि Chemistry हे दोन्ही विषय स्वतंत्रपणे ४०% गुणांनी उत्तीर्ण असेल तरच खालील प्रमाणे Basic Science विषयात सूट मिळण्यास पात्र राहील.

| Sr. No. | Passing Subjects of 12th Science/HSSC with minimum 40% marks | Exemption in Subjects & Code No. at Diploma level | |
|---|---|---|---|
| 1 | Physics & Chemistry | Basic Science | Physics (22102) |
| | | | Chemistry (22102) |
| 2 | Mathematics /Mathematics & Statistics | Basic Mathematics (22103) | |

त्याअनुषंगाने मंडळाच्या विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, संबंधित विद्यार्थ्यांकडून विनंती अर्ज प्राप्त झाल्यानंतरच वरीलप्रमाणे सूट देण्याची कार्यवाही करावी. विषयांत सूट घेतल्यानंतर त्या सत्राचा निकाल हा Pass Class म्हणूनच घोषित होईल, त्यात उत्तीर्ण श्रेणीचा उल्लेख राहणार नाही, ही बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रथम निदर्शनास आणावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचिव
म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत :** मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:**

१) उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय मुंबई/ पुणे/नागपूर/औरंगाबाद

२) उपसचिव (तां), कार्यासन क्र.४०, ४२, ४३, ४५, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ.

(स्वायत्त) (ISO: ९००१:२००८) (ISO/IES : २७००१-२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: २६४७१२५५ (का.)/२६४७ ०९१६ (वै.) फॅक्स ९१-०२२-२६४७३९८०

Email : secretary@msbte.com Web : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-५०/Exemption/२०१७/ 9224 दिनांक - 11 SEP 2017

**Web Circular**

**विषय : MS-CIT परिक्षा उत्तीर्ण होऊन प्रथम वर्ष अभियांत्रिकी 'I' Scheme पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी Exemption Subjects**

मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व AICTE Approved संस्थांना सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मधील प्रथम वर्षापासून 'I' Scheme लागू होत आहे. त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रथम वर्ष पदविका अभ्याक्रमास प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी जर प्रवेशापूर्वी MS-CIT परिक्षा उत्तीर्ण केलेली असेल व त्यांनी सूट मिळण्याकरिता अर्ज केला असेल तर त्यांना पदविका अभ्याक्रमाच्या Funamentals of ICT (२२००१) या विषयात सूट देण्यात येत आहे. ह्या विद्यार्थ्यांना परिक्षेचा निकाल पत्रात विशेष प्राविण्य / प्रथम/ व्दितीय (Distinction / १st Class / २nd Class) श्रेणीचा मंडळाच्या RG-५ नियमानुसार उल्लेख असणार नाही.

त्याअनुषंगाने मंडळाच्या विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, संबंधित विद्यार्थ्यांकडून विनंती अर्ज प्राप्त झाल्यानंतरच वरीलप्रमाणे सूट देण्याची कार्यवाही करावी. विषयांत सूट घेतल्यानंतर त्या सत्राचा निकाल हा Pass Class म्हणूनच घोषित होईल, त्यात उत्तीर्ण श्रेणीचा उल्लेख राहणार नाही, ही बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रथम निदर्शनास आणावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचिव
म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत** : मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :**

१) उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय मुंबई/ पुणे/नागपूर/औरंगाबाद
२) उपसचिव (तां), कार्यासन क्र.४०, ४२, ४३, ४५, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई